SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR - 416 004, MAHARASHTRA
PHONE : EPABX – 2609000, www.unishivaji.ac.in,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर – 416 004,
दुरध्वनी – ईपीएबीएक्स – 2609000, www.unishivaji.ac.in,
विद्यार्थी विकास विभाग

Estd. 1962
"A++" Accredited by NAAC(2021) With CGPA 3.52

Dr. P. T. Gaikawad
Director, Students' Development
Phone – (0231) 2609175, 2609475
Email: dsw@unishivaji.ac.in

जा. क्र. शिवाजी वि/विद्यार्थि विकास/१७७८ दि. : ०९/०८/२०२३

प्रती,
मा. अधिविभाग प्रमुख़ / संचालक / समन्वयक,
सर्व अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

**विषय : Anti Ragging Week च्या विविध कार्यक्रमाचे आयोजन करणेबाबत .....**

महोदय / महोदया,

उपरोक्त विषय संदर्भात यु.जी.सी.मार्फत दि. १२ ऑगस्ट Anti Ragging Day हा **Anti Ragging Week** म्हणून दि. १२ ऑगस्ट ते दि. १८ ऑगस्ट, २०२३ या कालावधीत साजरा करणेबाबत कळवण्यात आले आहे. विद्यार्थ्यामध्ये Ragging विरुद्ध जाणीवजागृती वाढवणे हा याचा मुख्य उद्देश आहे व या अनुषंगाने विद्यापीठ परिसरात विविध कार्यक्रम आयोजित करण्याबाबत कळवण्यात आले आहे. त्यानुसार या विभागामार्फत खालील कार्यक्रम आयोजित करण्यात येत आहेत.

१) घोषवाक्य स्पर्धा, पोस्टर मेकिंग स्पर्धा
२) Anti Ragging बाबत व्याख्यान
३) Short Film, Documentary सादरीकरण

पोस्टर मेकिंग स्पर्धा दि. १७ ऑगस्ट, २०२३ रोजी आयोजित करण्यात येणार आहेत. तसेच घोष वाक्य स्पर्धेसाठी दि. १७ ऑगस्ट, २०२३ पर्यंत गुगल फॉर्म द्वारा घोष वाक्ये पाठवावयाची आहेत. सोबत दोन्ही स्पर्धांची नियमावली जोडली आहे. तरी सदर स्पर्धेमध्ये आपल्या अधिविभागातील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना सहभागी होण्यासाठी प्रोत्साहन देण्यात यावे हि विनंती.

दि. १२/०८/२०२३ रोजी सायंकाळी ०६.०० वाजता राजर्षी शाहू सभागृह येथे **"Anti Ragging" या विषयावर डॉ. व्ही. एन. शिंदे, प्र. कुलसचिव यांचे व्याख्यान** आयोजित करण्यात आले आहे. सदर दिवशीच Anti Ragging बाबत Short Film, Documentary दाखवण्यात येणार आहे. तरी सदर कार्यक्रमासाठीहि आपल्या अधिविभागातील विद्यार्थ्यांना उपस्थित राहण्याबाबत सूचना देण्यात याव्यात दि विनंती. तसेच सदरचे पत्र विद्यार्थ्यांच्या माहितीसाठी सूचना फलकावर लावावे हि विनंती.

पोस्टर मेकिंग स्पर्धेसाठी गुगल लिंक - https://forms.gle/eJxvKFi8X4X7w8eg6

घोष वाक्य स्पर्धेसाठी गुगल लिंक - https://forms.gle/npopAkb28jMZeY1eA

कळावे,

आपला विश्वासू,

संचालक,
विद्यार्थी विकास विभाग

सोबत : वरील प्रमाणे

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## विद्यार्थी विकास विभाग

## Anti Ragging Week घोषवाक्य स्पर्धा नियमावली

युु.जी.सी. ने दि. १२ ऑगस्ट Anti Ragging Day हा Anti Ragging Week म्हणून दि. १२ ऑगस्ट, २०२३ ते दि १८ ऑगस्ट, २०२३ या कालावधीत साजरा करावयाचे ठरवले आहे. Ragging विरुध्द जाणीव जागृती वाढवणे हा याचा मुख्य उद्देश आहे. त्या अनुषंगाने घोषवाक्य स्पर्धाचे आयोजन करण्यात आले आहे. तरी घोषवाक्य स्पर्धेमध्ये सहभागी होऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी गुगलफॉर्म मध्ये स्वत:बद्दल आवश्यक ती माहिती व दोन घोषवाक्ये दि. १७ ऑगस्ट, २०२३ दुपारी १.०० वाजेपर्यंत भरावी. यानंतर स्पर्धकांना स्पर्धेमध्ये आपला सहभाग नोंदवता येणार नाही.

**स्पर्धेचे स्वरुप आणि अटी:**

१. सदर स्पर्धेसाठी प्रवेश विनामुल्य असेल.
२. घोषवाक्य मराठी, हिंदी किंवा इंग्रजी भाषेत असावेत.
३. स्पर्धकाने स्वत: तयार केलेले घोषवाक्य स्पर्धेसाठी पाठवावे.
४. एका स्पर्धकाची जास्तीत जास्त दोन घोषवाक्य स्वीकारली जातील.
५. स्पर्धेसाठी दिलेली घोषवाक्ये इंटरनेटवरुन घेतलेली नसावीत तसेच इतरत्र कुठेही प्रकाशित झालेली नसावीत.
६. तज्ञांनी परीक्षण करुन ठरवलेल्या प्रथम तीन क्रमांकांनाच प्रमाणपत्र व प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक प्राप्त विद्यार्थ्यांना अनुक्रमे रु. १,०००/—, रु. ७००/— व ५००/— इतकी रक्कम बक्षिस म्हणून देण्यात येईल.
७. सर्व सहभागी स्पर्धकांना प्रमाणपत्र देण्यात येईल.
८. स्पर्धेत कोणत्याही शाखेचे विद्यार्थी सहभागी घेऊ शकतात.
९. स्पर्धेचा निकाल विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यात येईल.
१०. घोषवाक्यांचे परीक्षण नियुक्त तज्ञांकडून केले जाईल.
११. परिक्षकांचा निर्णय अंतिम राहिल.
१२. मराठी, हिंदी आणि इंग्रजी या तीन भाषेतील प्रत्येकी पहिल्या तीन घोषवाक्यांना वरीलप्रमाणे पारितोषिके देण्यात येतील.

**गुगल फार्म लिंक :—** https://forms.gle/npopAkb28jMZeY1eA

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## विद्यार्थी विकास विभाग

## Anti Ragging Week पोस्टर मेकिंग स्पर्धा नियमावली

यु.जी.सी. ने दि. १२ ऑगस्ट Anti Ragging Day हा Anti Ragging Week म्हणून दि. १२ ऑगस्ट, २०२३ ते दि १८ ऑगस्ट, २०२३ या कालावधीत साजरा करावयाचे ठरवले आहे. Ragging विरुध्द जाणीव जागृती वाढवणे हा याचा मुख्य उद्देश आहे. त्या अनुषंगाने पोस्टर मेकिंग स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. तरी पोस्टर मेकिंग स्पर्धेमध्ये सहभागी होऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी गुगलफॉर्म मध्ये स्वत:बद्दल आवश्यक ती माहिती दि. १७ ऑगस्ट, २०२३ रोजी पर्यंत सकाळी ११.०० वाजेपर्यंत भरावी व दि. १७ ऑगस्ट, २०२३ दुपारी १२.३० वाजता राजमाता जिजाऊसाहेब सभागृह येथे उपस्थित रहावे. स्पर्धा कालावधी दुपारी १.०० ते ३.३० असा असेल.

**स्पर्धेचे स्वरुप आणि अटी:**

१. सदर स्पर्धेसाठी प्रवेश विनामुल्य असेल.
२. स्पर्धेसाठी एका अधिविभागातील कितीही स्पर्धकास भाग घेता येईल.
३. स्पर्धकास राजमाता जिजाऊसाहेब सभागृह येथे जागेवर बसून पोस्टर तयार करावयाचे आहे.
४. पोस्टरसाठी लागणारे सर्व साहित्य स्पर्धकांनी स्वत: आणावयाचे आहे. संयोजकामार्फत फक्त कागद पुरविला जाईल.
५. पोस्टरचा आकार २२‘‘ x १५‘‘ असेल.
६. प्रत्येक स्पर्धकाला किमान २ तास व कमाल २.३० तासांचा वेळ दिला जाईल.
७. पोस्टरसाठी कोणत्याही प्रकारचे ऑईल, वॉटर, पेस्टल इ. रंग वापरता येतील.
८. तज्ञांनी परीक्षण करुन ठरवलेल्या प्रथम तीन क्रमांकांनाच प्रमाणपत्र व प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक प्राप्त विद्यार्थ्यांना अनुक्रमे रु. १,०००/—, रु. ७००/— व ५००/— इतकी रक्कम बक्षिस म्हणून देण्यात येईल.
९. सर्व सहभागी स्पर्धेकांना प्रमाणपत्र देण्यात येईल.
१०. स्पर्धेत कोणत्याही शाखेचे विद्यार्थी सहभागी घेऊ शकतात.
११. स्पर्धेचा निकाल विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यात येईल.
१२. पोस्टर मेकिंग स्पर्धेचे परीक्षण नियुक्त तज्ञांकडून केले जाईल.
१३. परिक्षकांचा निर्णय अंतिम राहिल.

गुगल फार्म लिंक :— https://forms.gle/eJxvKFi8X4X7w8eg6